आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
ॲप डाउनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा!
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप!

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत



पान ८
मोठा पठाणची पत्नीसह 'भारतभ्रमंती'

शेवटचे पान
मँचेस्टर कसोटी अनिर्णित

पावसाने काजीगढीचा धोका वाढला



इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ | अंक ३२१ | सोमवार, दि. २८ जुलै २०२५ | पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## संपादकीय
### सुजाणत्वाची पेरणी

वाढती बालगुन्हेगारी हा गंभीर चिंतेचा विषय आहे. अनेक गंभीर गुन्ह्यांत अल्पवयीन मुलांचा सहभाग दिसून येत आहे. मुलांमध्ये हिंसक प्रवृत्ती वाढत आहे. अत्यंत किरकोळ कारणांवरून मुले एकमेकांच्या जीवावर उठतात. कोणत्याही कारणामुळे एकदा का मुलांचा गुन्हेगारी वर्तुळात प्रवेश झाला की, ते त्यात अधिकाधिक अडकत जाण्याचा धोका असतो. त्यात आता सायबर गुन्ह्यांची भर पडली आहे. इंटरनेटवरील 'डार्क वेब' हा भयानक प्रकार आहे. समाज माध्यमांवरील चकचकाटाचे आणि झगमगाटाचे आकर्षण मुलांना वाटू शकते. त्याच्या मोहापायी ते चुकीच्या मार्गाला लागू शकतात. पैसे कमावण्याचे बेकायदेशीर मार्ग शोधू शकतात. समाजविघातक कृत्यात सहभागी होऊ शकतात. त्यात अडकलेल्या मुलांचे आयुष्य पणाला लागते. त्यांच्यावर गुन्हेगारीचा शिक्का बसतो. भविष्य पान १० वर

**तापमान**

| | | |
|---|---|---|
| किमान | : | २२.१° |
| कमाल | : | २६.७° |

# पुण्यात रेव्ह पार्टीवर धाड

## खडसेंच्या जावयासह सात जणांना अटक

- बेचाळीस लाखांचे साहित्य जप्त
- पाच पुरुषांसह दोन महिलांचा समावेश

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहराच्या खराडी या उच्चभ्रू भागातील आलिशान फ्लॅटवर रविवारी पहाटे सव्वा तीनच्या सुमारास पुणे पोलिसांनी धाड टाकून एका रेव्ह पार्टीवर मोठी कारवाई केली. या कारवाईत राज्याचे ज्येष्ठनेते एकनाथ खडसे यांचे जावई आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर यांच्यासह ७ जणांना अटक करण्यात आली. त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सातही जणांना २९ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

अटक केलेल्यांत प्रांजल खेवलकर (वय ४१), प्रसिद्ध बुकी निखिल पोपटाणी (वय ३५), समीर फकीर महमंद सय्यद (वय ४१), सचिन सोनाजी भोंबे (वय ४२), श्रीपाद मोहन यादव (वय २७), ईशा देवज्योत सिंग (वय २२) आणि प्राची गोपाल शर्मा (वय २२) यांचा समावेश आहे.



### खराडीत 'आफ्टर पार्टी'?

खराडीतील ही पार्टी खरे तर 'आफ्टर पार्टी' होती, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. या पार्टीपूर्वी त्याच रात्री पुण्यात वेगवेगळ्या ठिकाणी दोन पार्ट्या झाल्या होत्या. पहिली पार्टी कल्याणीनगरमधील एका पबमध्ये रात्री १.३० वाजेपर्यंत सुरू होती. कल्याणीनगरचा पब बंद झाल्यानंतर काही जण मुंडवा भागातील पंचतारांकित हॉटेलमध्ये गेले. तिथे पहाटे ३ वाजेपर्यंत तिथे दुसरी पार्टी सुरू होती, कारण पंचतारांकित हॉटेलमध्ये त्या वेळेपर्यंत परवानगी असते. त्यानंतर तिसरी पार्टी स्टेबर्ड अझुर येथे सुरु होती.

रविवारी पहाटे ३.१५ सुमारास ही कारवाई करण्यात आली. खराडीतील 'स्टेबर्ड अझुर सूट' येथे पोलिसांनी छापा टाकला. यावेळी आरोपींकडून एकूण ४१,३५,४०० रुपये किमतीचे साहित्य जप्त करण्यात आले. यात २.७० ग्रॅम कोकेनसदृश पदार्थ, ७० ग्रॅम गांजासदृश पदार्थ, १० मोबाईल, दोन चारचाकी वाहने, हुक्कापॉट सेट, दारू व बियरच्या बाटल्या, हुक्का फ्लेव्हर असा अमली पदार्थ व इतर साहित्य असे एकूण ४२ लाख रुपये रोख किमतीचे साहित्य जप्त करण्यात आले. अटक केलेल्या सर्वांची ससून रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यांचे रक्ताचे नमुने घेण्यात आले. याप्रकरणी अमली पदार्थ प्रतिबंधक कायदा (एनडीपीएस) कायदा कलम ८(क), २२(ब)(११)अ, २१(ब), २७, कोटपा ७(२), २०(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रांजल खेवलकर यांना पुण्यातील ससून हॉस्पिटलमध्ये तपासणीसाठी नेले. वैद्यकीय तपासणी झाल्यानंतर खेवलकर यांना परत हडपसरच्या घरी आणण्यात आले. या घराची झाडाझडती घेऊन पोलिसांनी लॅपटॉप, हार्ड डिस्कसह विविध साहित्य जप्त केल्याचे समजते.

दरम्यान, रेव्ह पार्टीत सहभागी ७ जणांना तपासणीसाठी ससून सर्वोपचार रुग्णालयात काल पहाटे आणण्यात आले. त्यांच्या तपासणी अहवालातील माहिती समोर आली आहे. त्या माहितीनुसार, पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने सकाळी ६ वाजून १५ मिनिटांनी सात जणांना वैद्यकीय तपासणीसाठी आणले. अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार त्यांच्यावर कारवाई सुरू होती. त्यात ५ पुरुष आणि २ महिलांचा समावेश होता. त्यांनी मद्य पान १० वर



# दोन भाऊ पुन्हा एकत्र

## उद्धव ठाकरे यांना शुभेच्छा देण्यासाठी राज 'मातोश्री'वर

मुंबई । वृत्तसंस्था

शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त रविवारी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी 'मातोश्री'वर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी राज यांनी उद्धव यांना लाल रंगाचा गुलाब पुष्प-गुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

राज ठाकरे यांनी काल सकाळी ११.३० वाजता 'शिव-तीर्थ' येथून निघत दुपारी १२ वाजता 'मातोश्री' गाठले. राज ठाकरे आल्याचे समजताच उद्धव ठाकरे स्वत: त्यांच्या स्वागतासाठी बाहेर आले. तत्पूर्वी राज यांनी मनसे नेते बाळा नांदगावकर यांच्या फोन-वरुन खासदार संजय राऊत यांना फोन केला. मी 'मातोश्री'वर येत आहे, असा निरोप त्यांनी राऊत यांना दिला. राऊत यांनी हा निरोप उद्धव ठाकरे यांना दिला. त्यावेळी त्यांचा आनंद गग-नात मावेनासा झाला. त्यानंतर काही मिनिटांतच राज ठाकरे 'मातोश्री'वर पोहोचले. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकमेकांची गळाभेट घेतली.

राज आणि उद्धव ठाकरे यांच्या भेटीनंतर शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली. दोन्ही भाऊ 'मातोश्री'त गेल्यानंतर आत बरेच काही घडले. दोन भाऊ भेटले. एकमेकांना पान १० वर

### पुढचा काळ चांगला : उद्धव ठाकरे

राज यांनी 'मातोश्री'वर येऊन दिलेल्या शुभेच्छा आणि त्यांच्या भेटीमुळे आनंद द्विगुणीत झाला. नुसता द्विगुणीत नाही. कित्येक पटीने गुणीत झाला आहे. त्यामुळे नक्कीच पुढचा सर्व काळ चांगला होईल. आम्ही अनेक वर्षांनी भेटलो. ज्या घरात वाढलो, तिथे भेटलो. ज्यांनी आम्हाला वाढवले त्यांच्या खोलीत गेलो. आज बऱ्याच वर्षांनी राजने घरी येऊन शुभेच्छा दिल्या. आपल्या भाषेत द्विगुणीत शब्द आहे, पण त्यापेक्षा कित्येक पटीने हा आनंद मोठा आहे, अशा भावना उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केल्या.

